## रेग्युलर कज्जा क्रमांक ७०/१४.

## निशाणी ७६ खालील आदेश.

वादीने प्रस्तुतचा नि. ६७ ला तालुका निरिक्षक भुमी, अभिलेख हातकणंगले यांनी पाठविलेल्या कमिशन अहवाला परत त्यांचेकडे पाठवून गट नं. ६५० मध्ये प्रतिवादी क्रमांक १ चे आर.सी.सी. बांधकामाबाबत व क्षेत्राबाबत स्पष्ट अहवाल पुन्हा कमिशन होवून मिळणेबाबत दाखल केला आहे.

**२. थोडक्यात वादीचे कथन पुढीलप्रमाणे-**

वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, नि. ३७ प्रमाणे तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, हातकणंगले. यांनी या न्यायालयात नि. ६७ ला मोजणी अहवाल पाठविलेला आहे. परंतू सदर अहवाल हा अपुरा व संदिग्ध आहे. सदरचा अहवाल वादी, प्रतिवादी यांनी स्वतंत्र म्हणणे देवून नाकारलेला आहे. सदरचा अहवाल नि. ३७ वरील न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पाठविलेला नाही .प्रत्यक्ष जागेवर जावून उपअधिक्षक, भुमी अभिलेख, हातकणंगले यांनी मोजणी कामकाज केलेले नाही.त्यामुळे सदरचा अहवाल परत पाठवून उपअधिक्षक,भुमी अभिलेख, हातकणंगले यांना फेर मोजणी करणेबाबत आदेश करणेत यावा असे कथन केले आहे.

**३.** प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जास याचा अर्जावरती म्हणणे देवून तीव्र विरोध दर्शविला आहे. इतर प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दिले नाही. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, नि. ३३ वरील न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणी कामकाज होवून वस्तुस्थितीचा अहवाल न्यायालयात दाखल करणेत आलेला आहे. त्यामुळे पुन्हा उपअधिक्षक,भुमी अभिलेख हातकणंगले यांना सदर अहवाल पाठविणेत येवू नये व फेरमोजणी करणेत येवू नये. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, वादीने त्याच्या मुळ कथनाचे बाहेर जावून सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे तो रद्द होणेस पात्र आहे. त्यामुळे त्यांनी शेवटी अर्ज रद्द करणेची विनंती केली आहे.

४. वादी,प्रतिवादी तर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. निशाणी ३१ वरील आदेशाने नि.६७ ला प्रत्यक्ष मोजणी कामकाज होवून उपअधिक्षक, भुमी अभिलेख,हातकणंगले या कार्यालयाने अहवाल पाठविल्याची बाब उभय पक्षकारांना मान्य आहे. गट नं. ६५० ही दावा मिळकत वादीची, तर गट नं. ६४५ ही समाईकात प्रतिवादींची आहे. वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर मोजणी अहवालामध्ये गट नं. ६४५ मधील घर मिळकत म्हणजेच प्रतिवादीची घर मिळकत याचे लांबी-रुंदीसह मोजमाप अहवालामध्ये नमुद नाही. याउलट प्रतिवादीच्या वकिलांनी नि. ६७ च्या नकाशाचे अवलोकन करणेस विनंती केली. नि. ६७ वरील मोजणीदाराने दाखल केलेल्या अहवाल नकाशाचे अवलोकन करता प्रतिवादी याची घर मिळकत दाखविली असून केशरी रंगाने दाखविलेले क्षेत्र ०.४८ चौ.मी. हे गट नं. ६४५ चे वहिवाटीस असून ते गट नं. ६५० मधील आहे असे स्पष्ट नमुद केले आहे. तसेच नकाशामध्ये दाखवलेले क्षेत्र हे स्केल १:५०० प्रमाणे दाखविलेले आहे. त्यामुळे वादीच्या कथनास महत्व राहत नाही. तसेच वादी यांनी असे कथन केले की, त्यांचे क्षेत्राप्रमाणे मोजणीच्या हद्दी,नकाशात दाखविण्यात आल्या नाहीत. याउलट प्रतिवादीच्या वकिलांनी माझे लक्ष नि. ३७ वरील अर्जाकडे व त्यावर झालेल्या मोजणी आदेशाकडे वेधले असता असे दिसून येते की, वादी यांनी नि. ३७ च्या अर्जात गट नं.६५० व गट नं. ६४७ ची मोजणी करुन प्रतिवादी नं. १ चे नेमके कोणत्या गट नंबरच्या हद्दीमध्ये येते याबाबतचा अहवाल नकाशासह देणेबाबत विनंती केली आहे. सदर वादीच्या अर्जाप्रमाणे माझ्या पुर्वाधिका-यांनी दिनांक १४.०६.२०१४ रोजी मोजणी आदेश पारीत करुन आदेश कलम "२" मध्ये "कमिशनर यांनी गट नंबर ६४७ व ६५० यांची मोजणी करुन त्याचा अहवाल चतुःसिमा व नकाशासहीत सादर करणेचे आदेश देणेत येत आहेत. त्यामुळे नि. ३४ वरील झालेला आदेश गुणदोषावर व वादीच्या कथनाप्रमाणेच झालेचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज त्यांच्याच नि.३७ वरील मुळ मोजणी अर्जाच्या विरुध्द किंवा विसंगत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी यांच्या प्रस्तुत अर्जास कोणताही अर्थ राहत नाही. नि.६७ वरील

अहवाल हा प्रथमदृष्टया नि. ३४ वरील न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दाखल झाल्याचे दिसून येते त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही या निष्कर्षावर मी आलेलो आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

सही/-

(सं.मा.जाधव).

दिनांक २४.१०.२०१६

२ रे सह.दिवाणी न्यायाधिश क.स्तर
पेठवडगांव.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 24/10/16 |
| Judgment signed by the P.O. on | 24/10/16 |
| Judgment/Order uploaded on | 27/10/16 |